


कोल्हापूर : पंचगंगा बँकेच्या सुवर्णमहोत्सवाच्या प्रारंभ कार्यक्रमात बोलताना डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी तानाजी सावंत, पी. एल. जगताप.

# विश्वास, पत यावरच बँकेची प्रगती : कुलगुरू शिर्के

## पंचगंगा बँकेच्या सुवर्णमहोत्सवाला प्रारंभ

**कोल्हापूर, ता. २४ :** 'डाव्या हातात ठेवीदारांचा विश्वास आणि उजव्या हातात कर्जदारांची पत यावरच बँकेची प्रगती अवलंबून असते,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. पंचगंगा बँकेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाची सुरवात डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाली, त्या वेळी ते बोलत होते. या वेळी त्यांनी बँकेने लहान मुलांची साक्षरता वाढविण्यासाठी सुरू केलेल्या पिगी बँक योजनेचे कौतुक केले. बँकेच्या देवकर पाणंद येथील शाखेत कार्यक्रम झाला. शहर उपनिबंधक पी. एल. जगताप, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलिस निरीक्षक तानाजी सावंत आदी उपस्थित होते. अध्यक्षांनी बँकेच्या प्रगतीचा आढावा घेतला.

या वेळी शहर उपनिबंधक पी. एल. जगताप, श्री. सावंत यांची भाषणे झाली. बँकेच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त जीवनाधरा ब्लड बँकेच्या सहकार्याने आयोजित रक्तदान शिबिराला चांगला प्रतिसाद मिळाला. मुख्य कार्यकारी अधिकारी दीपक फडणीस यांनी स्वागत केले. उपाध्यक्ष राहुल भोसले यांनी आभार मानले. संचालक पी. एस. कुलकर्णी, विकास परांजपे, दिगंबर जोशी, चंद्रशेखर धर्माधिकारी, उपेंद्र सांगवडेकर आदी उपस्थित होते.

# आंतरराष्ट्रीय स्तरावर व्यापक संशोधन संधी

## प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील संशोधकांना आंतरराष्ट्रीय स्तरावर व्यापक करिअर संधी उपलब्ध आहेत. त्या संधींची माहिती घेऊन त्यांचा लाभ घेण्याची मानसिकता विद्यार्थ्यांत निर्माण होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

विद्यापीठाच्या इंटरनॅशनल अफेअर्स सेल आणि रसायनशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठात पीएच.डी. संशोधन करीत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी 'परदेशातील संशोधनविषयक करिअर संधी' या विषयावरील कार्यशाळेच्या उद्‌घाटन प्रसंगी डॉ. पाटील बोलत होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित 'आंतरराष्ट्रीय संशोधन करिअर संधी' विषयक कार्यशाळेत बोलताना प्र-कुलगुरू पी. एस. पाटील. सोबत ए. व्ही. घुले, जी. एस. गोकावी, के. एम. गरडकर आणि एस. डी. डेळेकर.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, परदेशामध्ये मूलभूत संशोधनासह उपयोजित संशोधनाच्या करिअर संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. आपण आपल्या संशोधनाची जागतिक स्तरावर सुरू असलेल्या संशोधनाशी सांगड घातली पाहिजे. जेणे करून त्याची दखल घेतली जाईल आणि या संधींचे महाद्वार आपल्यासाठी खुले होईल.


प्रा. एस. डी डेळेकर यांनी परदेशात उपलब्ध फेलोशिपविषयी माहिती दिली. यावेळी रसायनशास्त्रातील विभागप्रमुख डॉ. जी. एस. गोकावी, डी. एस. भांगे यांनीही मार्गदर्शन केले.

# संशोधकांना आंतरराष्ट्रीय संधी

## डॉ. पाटील; परदेशातील संशोधनविषयक करिअरवर कार्यशाळा

**कोल्हापूर, ता. २४ :** शिवाजी विद्यापीठातील संशोधकांना आंतरराष्ट्रीय स्तरावर व्यापक करिअर संधी उपलब्ध आहेत. त्या संधींची माहिती घेऊन त्यांचा लाभ घेण्याची मानसिकता विद्यार्थ्यांत निर्माण होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले. विद्यापीठाच्या इंटरनॅशनल अफेअर्स सेल आणि रसायनशास्त्र अधिविभागातर्फे विद्यापीठात पीएच. डी. संशोधन करीत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी 'परदेशातील संशोधनविषयक करिअर संधी' या विषयावर कार्यशाळा झाली. या कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी डॉ. पाटील बोलत होते.

डॉ. पाटील म्हणाले, की परदेशात मूलभूत संशोधनासह उपयोजित



प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील

संशोधनाच्या करिअर संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. आपल्या संशोधनाची जागतिक स्तरावर सुरू असलेल्या संशोधनाशी सांगड घातली पाहिजे. जेणे करून त्याची दखल घेतली जाईल आणि या संधींचे महाद्वारखुले होईल. आपले इंग्रजी भाषाज्ञान आणि आत्मविश्वास उंचावला पाहिजे. त्या बळावर आपल्यातील उणेपणाची भावना कमी होऊन आंतरराष्ट्रीय करियर संधींना आत्मविश्वासाने सामोरे जाऊ शकतो. त्या दृष्टीने विद्यापीठातील संशोधकांनी प्रयत्न करण्याची गरज आहे.

या वेळी प्रा. एस. डी डेळेकर यांनी परदेशात उपलब्ध फेलोशिपविषयी माहिती दिली. इंटरनॅशनल अफेअर्स सेलचे समन्वयक डॉ. ए. व्ही. घुले यांनी व्यावसायिक पद्धतीने सीव्ही कसा लिहावा. संवाद कौशल्ये विकास याविषयी माहिती दिली.

विभागप्रमुख डॉ. जी. एस. गोकावी, डॉ. डी. एस. भांगे यांनीही मार्गदर्शन केले. प्रा. के. एम. गरडकर, प्रा. पी.व्ही.अनभुले, प्रा. एस.पी. हंगीरगेकर, प्रा. के.के. शर्मा, डॉ. एस.एन. तायडे, डॉ. एस. ए. संकपाळ आदी उपस्थित होते. ऋतूजा चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. डॉ. घुले यांनी आभार मानले.

# ग्रीन इलेक्ट्रॉनिक्स विषयावर विद्यापीठात व्याख्यानमाला

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात ग्रीन इलेक्ट्रॉनिक्स विषयावरील व्याख्यानमाला इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागातर्फे नुकतीच झाली. विद्यापीठातर्फे ई-वेस्ट मॅनेजमेंट विंग तयार करण्याबाबत मान्यवरांनी सूचना केली.

व्याख्यानमालेचे उद्‌घाटन प्र-कुलगुरू प्रा.डॉ.पी.एस.पाटील यांनी केले. विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. आर. के. कामत यांची प्रमुख उपस्थिती होती. व्याख्यानमालेत प्रा. योगेश दूधपचारे, गडचिरोली यांनी 'गुगल अर्थ' चा कसा वापर करावयाचा आहे उदाहरणाद्वारे मांडले. दुसऱ्या सत्रात नागपूरच्या प्रा. श्रीकृष्ण ढाले यांनी बिल्डिंग कन्स्ट्रक्शन कसे असायला हवे, यावर मार्गदर्शन केले. तिसऱ्या सत्रात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या डॉ. रजनी पंचांग यांनी इलेक्ट्रॉनिक्स व पर्यावरण यांचा कसा समतोल साधायचा, यावर भाष्य केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्रा.एम.डी. शिरसाट यांनी सेन्सर टेक्नॉलॉजी कशा प्रकारे ग्रीन टेक्नॉलॉजी होऊ शकते, यावर मार्गदर्शन केले. समारोप प्रा. एस. एस. पन्हाळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. व्याख्यानमालेचे नियोजन समन्वयक डॉ. एम. के. भानारकर यांनी केले.

यावेळी इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग प्रा. डॉ. पी. एन. वासंवेकर, डॉ. पी. के. गायकवाड, डॉ. पी. ए. कदम डॉ. एस ए. शिंदे आदी उपस्थित होते.

# संत गाडगेबाबा जयंतीदिनी विद्यापीठात प्लास्टिक संकलन

**कोल्हापूर :** शिवजी विद्यापीठात कुलगुरू डॉ डी. टी. शिर्के, प्र कुलगुरू डॉ पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ व्ही. डी. नांदवडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या माध्यमातून संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त प्लास्टिक संकलन करण्यात आले. शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान विभाग व राजाराम महाविद्यालयातील स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी यांनी प्लास्टिक संकलन उपक्रम राबवला. या उपक्रमात विद्यापीठ परिसरातून १५ पोती प्लास्टिक संकलन करण्यात आले. यामध्ये पाण्याच्या बॉटल, प्लास्टिकच्या पिशव्या, बॅग, ई संकलन केल्या आहेत. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना कक्षचे संचालक प्रा अभय जायभाये, राजाराम महाविद्यालयाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. देशमुख, तंत्रज्ञान विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. अमोल कुलकर्णी आदि उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठात आज विद्या परिषदेची बैठक

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विद्या परिषदेची बैठक आज (दि. २५) रोजी होणार आहे. या बैठकीत परीक्षा ऑनलाईन की ऑफलाइन घ्यायच्या, अभ्यासक्रम किती टक्के कमी करायचा, परीक्षेचे नियोजन कसे करायचे, यासह अन्य विषयावर चर्चा होणार आहे. त्यामुळे शिक्षण वर्तुळाचे लक्ष या बैठकीकडे लागले आहे.

पुस्तक प्रकाशन : शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री कै. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनातर्फे पत्रकार मदन वायकुळेलिखित 'पत्रकारिता शोध आणि बोध' या पुस्तकाचे प्रकाशन, स्थळ : शिवाजी विद्यापीठ मानव्यशास्त्र सभागृह, वेळ : सकाळी १०.०० वाजता.

केंद्रीय मंत्रिमंडळाने नवीन शैक्षणिक धोरणाला मंजुरी दिलेली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात या नवीन शैक्षणिक धोरणाला सुरुवात होणार आहे. या शैक्षणिक धोरणानंतर मुलांच्या आयुष्यात आमूलाग्र बदल होणार आहेत, त्याचे कारण म्हणजे शैक्षणिक धोरण, म्हणजे शालेय शिक्षणापासून ते महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत मोठे बदल सुचविण्यात आले आहेत. कोरोनानंतर शिक्षण क्षेत्रात जे बदल होणार आहेत, त्याअनुषंगाने नवीन धोरणाचा विचार करता येईल. कृतिशील शिक्षणाकडे हे पाऊल ठरेल.



# नवे धोरण... कृतिशील शिक्षणाचे




प्रमोद बापट
अधिकारी, परीक्षा विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


**केंद्रीय** विकास मंत्रिमंडळाच्या वतीने एक समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने एक मसुदा तयार केला होता. गेली दीड-दोन वर्षे या मसुद्यावर हरकती आणि सूचना केंद्र सरकारने मागितल्या होत्या आणि त्यानंतर अखेर केंद्राने नवीन शैक्षणिक धोरणाला मान्यता दिलेली आहे. या धोरणानुसार शैक्षणिक धोरणात टप्प्याटप्प्याने बदल घडून येणार आहेत.

सुरुवातीला आता पूर्व प्राथमिक शिक्षण कसा पद्धतीने बदलणार आहे. नर्सरी, ज्युनिअर केजी, सीनिअर केजी, प्राथमिक या शिक्षणासाठी एक समान अभ्यासक्रम एनसीईआरटी तयार करणार आहे. हा अभ्यासक्रम देशभरात सर्व प्राथमिक शाळांना लागू असेल. त्यानंतर शालेय शिक्षणाकडे जर वळलो तर त्यामध्ये चार महत्त्वाचे टप्पे या धोरणामध्ये मांडिलेले गेले आहेत. पूर्वीपासून १०+२ अशी शिक्षणपद्धती होती. त्यामध्ये दहावीपर्यंतचे शिक्षण आणि त्यामध्ये अकरावी, बारावी कनिष्ठ महाविद्यालयाचे शिक्षण, तर नव्या धोरणामध्ये ५+३+३+४ अशा पद्धतीचे पॅटर्न तयार करण्यात आलेले आहेत. त्यानुसार पूर्व प्राथमिक ३ वर्षे आणि पहिली ते दुसरी असे एकूण ५ वर्षांचा पहिला टप्पा असणार आहे, तर दुसऱ्या टप्प्यामध्ये तिसरी, चौथी, पाचवी अशा तीन इयत्ता असणार आहेत. तिसऱ्या टप्प्यामध्ये ३ वर्षे म्हणजे सहावी, सातवी आणि आठवीचे शिक्षण असणार आहे. तसेच चौथा महत्त्वाचा टप्पा म्हणजे आठवी ते बारावी असे सलग शिक्षण असणार आहे. तेव्हा या पॅटर्नमुळे बोर्डाच्या परीक्षा होतील की नाही, असा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे. केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाकडून त्यामुळे बोर्डाच्या परीक्षा आता रद्द होतील, असे नाही, पण बोर्डाच्या परीक्षांना आतापर्यंत महत्त्व दिले गेलेले आहे, तेवढे महत्त्व येत्या काळात दिले जाणार नाही. याचे कारण म्हणजे आता बोर्डाच्या परीक्षेसाठी म्हणजे दहावी, बारावीच्या परीक्षेसाठी दोन सेमिस्टरच्या पॅटर्नमध्ये परीक्षा होणार आहेत. त्यामुळे केवळ एकदाच परीक्षा घेऊन त्या आधाराधार जो निकाल येतो, त्यावर पुढच्या वर्षीचे प्रवेश प्रक्रिया आधारित नसेल आणि दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे या धोरणामध्ये विद्यार्थ्यांना अनेक विषय निवडण्याचे पर्याय देण्यात आले.

उदाहरण देताना मनुष्यबळ विकास मंत्रालयाकडून असे सांगण्यात येते की, जर एखादा विद्यार्थी आठवीच्या वर्गात असेल आणि त्याला विज्ञान, गणित या विषयांसोबत संगीत शिकायचे असेल, तर तसा विषय अभ्यासासाठी निवडता येईल, असे विविध पर्याय सहावी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना मिळणार आहेत. त्यामुळे एक प्रकारे भविष्यात एकाच विषयासाठी एकाच शाखेसाठी जी स्पर्धा आपल्याला दिसत होती म्हणजे कला, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी आणि कायदा शाखेसाठी स्पर्धा दिसत होती, ती काही प्रमाणात कमी होण्याची शक्यता आहे. कारण विद्यार्थ्यांना सहावी ते बारावी या काळामध्ये वेगवेगळे विषय काय असतील, त्याचे प्रशिक्षण कसा पद्धतीने दिले जाईल, याबाबत अजून स्पष्ट माहिती मंत्रालयाकडून प्राप्त झालेली नाही.

शालेय शिक्षणातला दुसरा आणखी महत्त्वाचा मुद्दा म्हणजे संख्या आणि अक्षर वाचन, म्हणजे संख्या आणि अक्षर यांची ओळख ही मूलभूत शिक्षणाची पायाभूत पीठ मानली जाणार आहे. तिसरीच्या विद्यार्थ्यांना वाचायला येते की नाही हे पाहण्यासाठी एक स्वतंत्र आस्थापना केंद्र सरकारकडून तयार करण्यात येणार आहे. त्यामुळे बालवाडीपासून म्हणजे नर्सरीपासून ते इयत्ता तिसरीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना संख्या आणि अक्षरांची ओळख झाली पाहिजे, म्हणजे वाचन करता आले पाहिजे. यासाठी शैक्षणिक धोरणात भर देण्यात आलेला आहे. यामध्ये आणखी एक महत्त्वाचा मुद्दा आहे, तो म्हणजे सहावीपर्यंत विद्यार्थ्यांना व्होकेशनल कोर्ससाठी प्रवेश घेता येणार आहे.

म्हणजेच त्यांचे रेनिंग शिक्षणातील विषय आहेत, उदा. विज्ञान, गणित, इतिहास, भूगोल या मळलेल्या विषयांबरोबरच विद्यार्थ्यांना आता जर कामाचे शिक्षण घ्यायचे आहे, तर आयटीआयच्या माध्यमातून जे शिक्षण दिले जाते, त्याला खूप महत्त्व येणार आहे. एखादे इलेक्ट्रॉनिक शिक्षण आहे, त्याचबरोबर लॉन्ड्री, वेल्डिंग हे स्किल डेव्हलपमेंटमधील शिक्षण आहे, त्यामधील विषय पर्याय म्हणून निवडण्याची संधी आता या धोरणानुसार विद्यार्थ्यांस देण्यात आली आहे. सिवाय याच विषयांतर्गत विद्यार्थ्यांना इंटर्नशिप करता येईल, असेसुद्धा या धोरणामध्ये म्हटलेले आहे. शालेय शिक्षणामध्ये पहिली ते आठवीपर्यंतचे शिक्षण मातृभाषेमध्ये देण्यासाठी प्राधान्य द्या, असेही नवीन शैक्षणिक धोरणात सुचवले आहे. नवीन धोरणानुसार केवळ अभ्यासक्रमाला महत्त्व न देता विद्यार्थ्यांच्या कलागुणांना महत्त्व देण्याबाबत शिफारस होत आहे आणि त्याच्या रिपोर्ट कार्डमध्ये आता बदल होणार आहेत. म्हणजे वर्षाअखेर ज्या विद्यार्थ्यांना जो निकाल देण्यात येतो.


» पान २ वर...

















# नवे धोरण कृतिशील शिक्षणाचे



» पान १ वरून...
त्यामध्ये साधारण विद्यार्थ्यांना ग्रेड देण्यात येतात, त्यांचे गुण देण्यात येतात आणि शिक्षकांचा एक ते दोन ओळींमध्ये अभिप्रायच्या माध्यमातून शेरा असतो; पण आता केवळ एवढ्यावरच पुरे असणार नाही. त्याचे कारण म्हणजे पूर्व प्राथमिक शिक्षणापासून बारावी शिक्षणापर्यंत दरवर्षी विद्यार्थ्यांचा एक वेगळा रिपोर्ट कार्डद्वारे निकाल तयार होणार आहे. ज्यामध्ये केवळ शिक्षकांचा नव्हे, तर विद्यार्थी आणि विद्यार्थ्यांचे मित्र यांचा समावेश आहे, तो महत्त्वाचा आहे. त्या अभ्यासक्रमावर आधारित मार्क असणार आहेत, पण त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी वर्षभरात काय शिक्षण घेतले, त्यांचे वैयक्तिक अनुभव काय आहेत? त्याअनुषंगाने त्यांनी स्वतःमध्ये तसे अनुभव डेव्हलप केले आहेत काय? असे अनेक विषय जे आहेत ते या रिपोर्ट कार्डमध्ये आता नमूद करता येणार आहेत. जेव्हा विद्यार्थी बारावीनंतर पुढील शिक्षणासाठी जाईल तेव्हा त्याला एकूण १५ वर्षांचे एक रिपोर्ट कार्ड देण्यात येईल.

उच्च शिक्षणाबाबत म्हणजेच महाविद्यालयीन अभ्यासक्रमाची सुरुवात महाविद्यालयीन प्रवेश प्रक्रियेपासून कशा पद्धतीने असणार आहे, यामध्ये महत्त्वाचा आणि मोठा बदल येत्या काळात होऊ शकतो. तो म्हणजे देशभरात महाविद्यालयीन प्रवेशासाठी प्रवेश प्रक्रिया घेण्यासाठी एक स्वतंत्र आस्थापना तयार केली जाणार आहे. त्याद्वारे महाविद्यालयीन प्रवेश प्रक्रिया होणार असल्याचे संकेत आहेत. महाविद्यालयीन शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांना विविध विषयांचे पर्याय असणार आहेत. उदा. क्रीडा-संगीतासकट जो विषय आहे, तो शिक्षणामध्ये एक पर्याय म्हणून घेण्यात येईल. त्याचे गुणही पुढील शिक्षणासाठी ग्राह्य धरले जातील. तेव्हा उच्च शिक्षणामध्येही आता केवळ कला, विज्ञान आणि वाणिज्य, वैद्यकीय, अभियांत्रिकी असे पर्याय नसून त्यामध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांसाठी वेगळे पर्यायसुद्धा सुचविलेले आहेत; मात्र अजून त्याबाबत कोणताही ठोस निर्णय नियोजन मनुष्यबळ विकास मंत्रालयाकडून मांडण्यात आलेला नाही. याव्यतिरिक्त विद्यार्थ्यांना ई-लर्निंगसाठी आठ भारतीय भाषांचा पर्याय दिला जाईल, शिवाय ऑनलाइन शिक्षणालाही महत्त्व दिले जाणार आहेच. देशात नवीन शैक्षणिक धोरण लागू करत असताना, शालेय ते उच्च शिक्षणामध्ये एवढे मोठे बदल होत असताना, त्याची अंमलबजावणी करण्यासाठी एक आर्थिक तरतूद करणे गरजेचे आहे. त्यामुळे येत्या काळात त्याची अंमलबजावणी कशा पद्धतीने होईल, याकडेसुद्धा लक्ष राहणार आहे. शिवाय नवीन शैक्षणिक धोरणाबाबत आणखी सविस्तर माहिती यायची आहे. प्रत्येक इयत्तेसाठी सरकारने कशा पद्धतीने वेगळा विचार केलेला आहे. तसेच शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांचेही याबाबत विचार किंवा प्रतिक्रिया काय आहेत आणि राजकीय वर्तुळातून याबाबत वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटत आहेत.

कधीकाळी आपण असे म्हणतो शरीराला श्रमाकडे, बुद्धीला मनाकडे आणि हृदयाला विचाराकडे घडविणे म्हणजे शिक्षण. अर्थात शिक्षणाचा दर्जा जरी सुधारला असला तरी आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची कशी करण्याची जी तयारी आहे.



त्याअनुषंगाने विद्यार्थ्यांच्या बुद्धीला मनाकडे म्हणजे मनावर असणारे बंधन आणि मनामध्ये असणारे व्यावहारिक विचार यांची सांगड घालून केलेली तयारी फार महत्त्वाची आहे. मोबाईल किंवा संगणकीय तंत्रज्ञान घरोघरी वास करीत आहे. अगदी लहान मुलांपासून वयोवृद्ध व्यक्तींपर्यंत याचा उपयोग केला जात असल्याचे दिसते. त्याचा उपयोग कसा करायचा याबाबतचे ज्ञान संगणकातूनच मिळते. इथे एखाद्या घरातील लहान मूल मोबाईलचा आवाज आला की तो पटकन उचलून, 'अरे, कोण बोलतंय!' असा उच्चार करतात. अर्थात, आपण सहज बोलून जातो अलीकडच्या मुलांना काही सांगाव लागत नाही. तीच लहान मुलं घरातील वयोवृद्ध व्यक्तींना मोबाईल किंवा संगणकाचे ज्ञान देत असल्याचे पाहायला मिळते. म्हणजे नातू आजोबा-आजीला शिकवतो. नातू हाच या वयात आजा-आजीचा गुरू बनल्याचे दिसून येते. माणसाला समजायचे असेल तर त्याला स्वातंत्र्य प्रकाश आणि झळकायचे असेल तर स्वतःचेच तेज निर्माण करता आले पाहिजे. यात वयाची अट नसते तर कृतीची गरज आहे.

अलीकडे विद्यार्थ्यांमध्ये जे सुधारित शैक्षणिक बदल होत चालले आहेत, त्यातले चुकीच्या निर्णयामुळे त्यांना अनुभव वाढतो आणि योग्य निर्णयामुळे त्यांच्यामध्ये आत्मविश्वास वाढीस लागतो, ही भूमिका दिसून येते. आपल्याकडे काय आहे किंवा आपण कोण आहोत यावर अवलंबून राहून आपल्या मनात कोणते विचार चालू आहेत यावरच ते स्वतःचे मार्ग शोधत असतात.



















